# नवी भंगाश्वनकथा

-नी.र. वऱ्हाडपांडे

पतिराजांच्या भीतीमुळे मीही मद्याचा घोट घेतला. पतिराज त्या सवतीमुळे माणसात राहतात की नाही, याची काळजी वाटली. जेवणानंतर त्यांनी सिगारेट शिलगावली व स्वत: ओढलेलीच सिगारेट माझ्या तोंडात खुपसली. नाही म्हटले तर पतिराज थोबाडीत देखील मारतील म्हणून एक झुरका जमेल तसा मीही मारला.

ओठकळया बारिकशा, वेतासम डौल अंगयष्टीचा।
ताठ उरोज शुभाकृति, नाक हरी गर्व वैनतेयाचा ॥१
गोधूमवर्ण निर्मळ, मुद्रेवर तेज बुद्धिमत्तेचे।
रूपात मोहिनीच्या पाहुनि घ्या दिव्य रूप विष्णूचे ॥२

वझेशास्त्र्यांच्या महाभारतावरील प्रवचनाला सरोजबरोबर गेलो होतो.

वझेशास्त्र्यांचे प्रवचन सुरू होते.

भीष्माला युधिष्ठिराने विचारले,

''पितामह, कामजीवनात स्त्रीला जास्त आनंद वाटतो की पुरुषाला?''

''हा प्रश्न श्रीकृष्णाला न विचारता भीष्माला विचारण्याची बुद्धी फक्त युधिष्ठिरालाच होऊ शकते.'' माझ्या मनात आले.

भीष्म म्हणाला,

''या प्रश्नाचे उत्तर भंगाश्वन राजाच्या कथेत आहे. भंगाश्वन राजा एकदा शिकारीस गेला असता स्नान करण्यास एका सरोवरात उतरला. स्नान करून बाहेर येतो तो काय? त्याचे शरीर ठेंगणे झालेले, छातीवर स्तन वाढलेले. दचकून आणखी चाचपणी करतो तो काय, आपण पूर्णपणे स्त्री झालेलो आहोत. हे त्याला कळून चुकले. तो आपल्याला पूर्ववत पुरुषत्व यावे म्हणून ईश्वराची प्रार्थना करू लागला. तेव्हा आकाशवाणी झाली-

''माझ्या सरोवरात जो स्नान करतो त्याला हेच शासन भोगावे लागते.'' भंगाश्वन राजा कळवळून म्हणाला.

आपण कोणीही असलात तरी दैवी आहात हे स्पष्ट आहे. तेव्हा माझा अपराध माफ करून मला आपले पूर्वीचे रूप द्यावे.

''स्त्रीच्या जीवनाचा तुला पूर्ण अनुभव आल्याखेरीज याचा विचार करता येत नाही. तुला अपत्ये झाल्यावर तू पुन:प्रार्थना कर.''

भंगाश्वनीला पुढे एका राजापासून मुलगा झाला. या राजपुत्राचे भंगाश्वनाला पूर्वाश्रमी झालेल्या मुलाशी वितुष्ट आले व द्वंद्वयुद्धाने त्याचा निकाल लावण्याचे ठरले. दोन्ही मुले आपलीच आहेत तेव्हा हे युद्ध थांबावे म्हणून भंगाश्वनीने प्रार्थना केली. ''तू दोघांपैकी कुणा एकाच्या जीवदानासाठी प्रार्थना कर. ती मान्य करण्यात येईल. पण ठरलेल्या द्वंद्वयुद्धात एक तरी मरणारच,'' असे तिला सांगितल्यावर तिने स्त्री असताना आपल्याला झालेल्या मुलास जीवदान मागितले. यावरून असे ठरते की, अपत्योत्पादनात स्त्रीला पुरुषापेक्षा जास्त आनंद होतो.

मी सरोजला म्हटले, ''भीष्माचं हे तर्कशास्त्र मला मुळीच पटलं नाही. पुरुषापेक्षा स्त्रीचं आपल्या मुलावर अधिक प्रेम असतं, असं फार तर म्हणता येईल. पण त्याचं कारण रतिक्रीडेत तिला जास्त आनंद होतो, हे नाही. ती मुलाला नऊ महिने पोटी वागवते हे आहे.''

सरोज काही बोलली नाही.


यानंतर काही दिवसांनी एका शारीरिक मानसशास्त्रज्ञाचे कामजीवनावर व्याख्यान असल्याची जाहिरात आली. आम्ही व्याख्यानाला गेलो.

व्याख्यानात मानसशास्त्रज्ञाने सांगितले-

''स्त्री-पुरुषांच्या शरीररचनेत जन्मत:च भेद असतो. जसजसे वय वाढत जाते तसतसा तो भेद वाढत जातो व प्रौढावस्था प्राप्त झाल्यावर पूर्णत्वास पावलेला असतो. लिंगभेद प्राथमिक व दुय्यम असे दोन प्रकारचे असतात. जननेंद्रिये व अपत्य-

संगोपनाशी संबंद्ध असलेले अवयव हे प्राथमिक लैंगिक गुणधर्म होत. याव्यतिरिक्त संभोग व जनन यांच्याशी साक्षात संबंध नसलेले जे गुणधर्म वाढीस लागून स्त्री-पुरुषातील भेदाला उठाव देतात त्यांना दुय्यम लैंगिक गुणधर्म म्हणतात. हे गुणधर्म म्हणजे पुरुषाची दाढी, कंठ, आवाजातील कठोरता वगैरे.

काही काही व्यक्तीत पुरुषत्व व स्त्रीत्व यात फार थोडा फरक असतो. अशा व्यक्तीत ज्याचे



प्राधान्य आहे ते वाढविण्याचे म्हणजे अर्धवट पुरुषाला पूर्ण पुरुष व अर्धवट स्त्रीला पूर्ण स्त्री करण्याचे सामर्थ्य आजच्या शल्यविद्येत होतेच. मी संशोधन करून कोणत्याही व्यक्तीचे शास्त्रोपचाराच्या साहाय्याने लिंगांतर करू शकतो. याहूनही जास्त म्हणजे माझ्या पद्धतीप्रमाणे लिंगांतर करून झालेल्या स्त्रीला अपत्ये होऊ शकतात. पूर्वी हे शक्य नव्हते. तसेच लिंगांतर केलेल्या व्यक्तींना परत पूर्वरूपास यायचे असेल तर तसेही मी करू शकतो.

प्रश्नांना दिलेल्या वेळी मी विचारले -

"तुमच्या शल्यक्रियेने एखाद्या पुरुषाला स्त्री केले तर त्याची बुद्धी कमी होते काय?"

श्रोत्यांत कुठे कुठे अर्धवट हास्य ऐकू आले.

"असे होण्याचे काही कारण नाही. स्त्रीची बुद्धी पुरुषाच्या बुद्धीपेक्षा कमी असते, या समजुतीने हा प्रश्न करण्यात आला आहे." डॉ.

दुसरा प्रश्न.

"एखाद्या पुरुषाने तुमच्या पद्धतीने स्त्रीत्व प्राप्त केले तर त्याचा रतिक्रीडेतला आनंद कमी होईल काय?"

डॉक्टर, "जननेंद्रियात स्पंदन झाल्याशिवाय रतिक्रीडेत पूर्ण आनंद होत नाही. पुरुषाचे असे स्पंदन नेहमीच होते. पण स्त्रीचे नेहमी होईलच असे नाही. पण यासाठी स्त्रीत्वप्राप्तीला कचरण्याचे कारण नाही. योनीचे स्पंदन होण्यासाठी रतिक्रीडा कशी करावी, याचा वैज्ञानिक सल्ला घ्यावा. शिवाय स्त्रियांनी रतिक्रीडेची आवड ही स्त्रियांना भूषणावह नाही, ही कल्पना सोडली पाहिजे. शल्यवैद्याने आपल्या कामात रक्तस्राव करण्यास भिणे हे भूषण नाही. त्याचप्रमाणे शय्यागृहात शालीनता हे भूषण नाही."

त्या रात्री मी याच भाषणावर विचार करीत होतो. भंगाश्वनकथेचे तात्पर्य खोटे हे आता डॉक्टरांच्या सांगण्यावरून स्पष्टच झाले.

सरोजकडे पाहून माझ्यातला पुरुष जागा झाला. मी तिला जवळ ओढू लागलो. तेव्हा ती त्रासून म्हणाली,

"तुम्हाला तर दुसरं काही सुचतच नाही."

"मला तरी अशा अनुभवावरून ती भंगाश्वनीची गोष्ट साफ खोटी वाटते."

"काही खोटी नाही. तुम्ही जरा जास्तच अधाशी पुरुष आहात." सरोज.

"दुसरे पुरुष कसे आहेत हे तुला कसे कळले?" मी.

"काही तरीच बोलू नका." सरोज.

"आपण दोघांनीही एका वर्षासाठी आपले लिंगांतर करवून घ्यावे, म्हणजे या वादाचा कायमचा निकाल लागेल." मी.

"तुम्ही अगदी मुलखावेगळे आहात." सरोज

असे म्हणून सरोज चक्क घोरू लागली. माझा निरुपाय होऊन मी अभ्यासिकेत जाऊन सगळ्यात जास्त कंटाळवाणे एक पुस्तक वाचायला काढले. थोड्याच वेळात कोचावर मी झोपी गेलो.

सरोज सकाळीच कोचावर चहा घेऊन आली व म्हणाली ''तुमची कालची सूचना विचार करण्यासारखी आहे. एक नवीन अनुभव येईल.''

हे ऐकून आश्चर्य वाटले. सरोजला या विषयात काही स्वारस्य नाही, असे मला वाटले होते. पण तिने यावर माझ्याहीपेक्षा जास्त विचार केलेला दिसला. डॉक्टरांच्या व तिच्या मला माहीत नसलेल्या भेटी झालेल्या आहेत, हे स्पष्ट दिसत होते.

''नवीन जीवन नाही आवडलं तर पुन:पूर्वीचं परत मिळवता येईल.'' मी. यावर सरोजने पूर्ण मौनाने उत्तर दिले.

आम्ही दोघेही डॉक्टरांना भेटलो. आपली इच्छा कळविली. मी जिज्ञासेने विचारले.

''डॉक्टर, आमच्यासारखे विक्षिप्त लोक तुम्हाला पूर्वी भेटले काय? पुरुष व्हायला तयार असलेली एखादी स्त्री भेटू शकेल. पण स्त्री व्हायला तयार असलेला माझ्यासारखा पुरुष तुम्हाला भेटला असेलसे वाटत नाही.''

''ज्यांना मुली जास्त होतात असे पालक तर शेकडयांनी माझ्याकडे येऊन आपल्या मुलींचे लिंगांतर करवून गेले आहेत. मी मुलगा नसून फार मुली असणाऱ्यांनाच अशी मदत करतो. नवीन अनुभव घेण्याच्या इच्छेने स्त्री होण्यास तयार असलेले काही पुरुष असतात.''

झाले एकापाठोपाठ दोघांचीही शल्यक्रिया आटोपली. एक महिना डॉक्टरांच्या देखरेखीखाली वेगळे राहावे लागले. हा महिना बहुधा अंथरूणातच गेला.

एक महिना झाल्यावर मी सकाळी उठून स्नानगृहात गेलो. परिचारिकेने माझी स्त्रियांना शोभेल अशी वेशभूषा करून दिली. आरशात प्रथमच पाहिले तेव्हा समोर एक स्त्री दिसली. माझ्या स्नानगृहात अचानक एक परस्त्री कशी आली म्हणून विचार करतो तोच हा आरसा आहे व आपलेच हे रूप आहे हे लक्षात आले. वेशभूषा व स्त्रीत्व सोडले तर बांधा व चेहरा पूर्वीसारखाच होता. माझ्या जुळ्या बहिणींसारखा मी दिसत होतो.

मी अंतर्मुख झालो. माझी मन:स्थिति आनंदाची होती की दु:खाची? नवीन जीवनाबद्दल कुतूहल होते, तसेच काळजीही होती. आपण हा निर्णय घेण्यात चूक तर केली नाही? पण जास्त प्रभावशाली असलेले मन म्हणाले,''काय अनर्थ होणार आहे? जगात अर्धी संख्या स्त्रियांची आहे. त्यांचे जीवन काय बहुधा अनर्थांनी भरलेले आहे? शिवाय आपण संत सखूच्या जमान्यात थोडेच राहत आहोत. एक नवीन अनुभव! कधीही आपल्या स्वप्नात नव्हता असा. याचे मोल सुखदुःखाच्या साध्या मापांनी करता येणार नाही. सायनाइडची चव कळण्यासाठी एका वैज्ञानिकाने सायनाइडदेखील चाखून पाहिले होते. मग स्त्रीत्व आले म्हणून एवढे भ्यायला काय झाले?''

बाहेर आलो तेव्हा डॉक्टर म्हणाले, ''तुम्हाला भेटायला कुणी तरी आलं आहे.''

मी दिवाणखान्यात आलो तो सरोजचे बंधू आले आहेत, असे वाटले. पण त्यांना नावाने हाक मारायच्या आतच हे ते नव्हेत हे कळले व खरा प्रकार माझ्या डोक्यात शिरला. मला फारच विचित्र वाटू लागले. तोंडातून शब्द फुटेना. ''मी आता पत्नी आहे व हा माझा नवरा आहे. आता पूर्वीचं विसरा सगळं.''

मी गांगरलो होतो. पण सरोज - आता कसली सरोज - आमचे पतिराज गांगरले नव्हते. ते म्हणाले,

''कामिनी, तुझं नाव मी कामिनी ठेवलं आहे. माझं नाव अविनाश. आता आपलं आडनाव आमचं म्हणजे सरोजच्या माहेरचं, कामिनीच्या नव्हे.''

''तू तर पहिल्याच दिवशी सरावली आहेस.''

''सरावलीस वगैरे सोड. पूर्वीचं सगळं विसर. हा नवा जन्म आहे.''

हे बोलणं सुरू असताच डॉ. आत आले. ते म्हणाले,

''नवा जन्म वगैरे काही नाही. लिंगभेदाशिवाय तुमच्यात काहीच फरक झालेला नाही. माझ्या शल्यक्रियेने पुरुष आपल्या जुळ्या भावासारखा व स्त्री आपल्या जुळ्या बहिणीसारखी होते. तुमचा मेंदू पूर्णपणे पूर्वीचा आहे. तुम्हाला कसलाही विसर पडणार नाही. तुम्ही लिंगांतर केले आहे, ही गोष्ट आता तुमच्या सर्व माहितीसह राज्यपत्रामध्ये छापून आली आहे. त्याची एक प्रत मी तुम्हाला देतो. ही नेहमी जवळ ठेवा. जिथे तुम्ही नोकरी करता त्या खात्याला हे दाखविले तर तुमची नोकरी तुमचे नवे नाव घालून पूर्वीप्रमाणेच चालू राहील, बँकेत दाखवले तर तुमची सध्याची सर्व खाती तुमच्या नव्या नावावर बदलून तुम्हाला मिळतील. विवाह नोंदणी दप्तरात गेलात तर याच्या आधारावर तुमच्या पूर्वीच्याच विवाहाचे नवीकरण तत्क्षणी करून मिळेल. नवीकरण म्हणजे जुनाच विवाह अजून कायम आहे, असे प्रमाणपत्र. या राज्यपत्राचे असे अनेक उपयोग आहेत.''

लिंगांतर केल्यामुळे स्त्रीने आपल्याला लोक शिखंडी समजतील व पुरुषाने ते आपल्याला हिजडे समजतील अशी भीती बाळगण्याचे कारण नाही. हे राज्यपत्र तुम्ही इतर स्त्रीपुरुषासारखेच आहात, याची ग्वाही देते. तुम्ही जेथे कामावर जाता तेथे ज्यांच्याशी तुमचा संपर्क येतो त्यांना पोलिस कमिश्नर एक व्याख्यान देईल व 'तुमच्यातच इतर स्त्रीपुरुषांत काहीच फरक आहे. असे मानून कोणी अपमान केल्यास व इतर कोणताही त्रास दिल्यास त्वरित कारवाई केली जाईल.' असे बजावेल.

लिंगांतर करून घेण्यास जास्तीत जास्त लोकांनी विशेषत: पतिपत्नींनी पुढे यावे, अशी सरकारची नीती आहे. यामुळे स्त्री पुरुषापेक्षा हीन आहे, असे मानण्याची घातक प्रवृत्ती नाहीशी

होईल. शिवाय या शल्यक्रियेने एका नवीन तऱ्हेचा आनंद उपलब्ध होईल. याची साक्ष देणारी तुमच्यासारखी जोडपी असली तर हजारो जोडपी ही शल्यक्रिया करवून घेण्यास तयार होतील. तुम्ही या क्षेत्रातले पहिले मानकरी आहात. म्हणून सरकारने मोहनरावांना दोन लाख रुपयांचे व सरोजताईंना एक लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर केले आहे. त्याचाही उल्लेख या राज्यपत्रात आहे.

"हा तर लिंगाधारित पक्षपात झाला." पतिराज म्हणाले. "अजून मोहनरावासारखा कोणी पुरुष आपल्या देशात तयार झाला नाही. स्त्रिया मात्र पुष्कळ तयार झाल्या. यावरून असं करणं आवश्यक आहे. असं सरकारला व मलाही वाटतं."

आमचे पतिराज मिस्कीलपणे म्हणाले,

"स्वेच्छेने स्त्री व्हायला तयार असलेले फारच विरळा असणार. स्त्रिया मात्र मोठ्या प्रमाणावर पुरुष होतील व मग आम्हा पुरुषांची पंचाईत."

"ही तर फारच लवकर आपले पूर्वरूप विसरली आहे." माझ्या मनात विचार आला.

इतक्यात डॉक्टरांच्या नोकराने वर्तमानपत्रे आणून दिली. त्या सर्वांत आमच्या फोटोसकट या पारितोषिकाचे व "या जोडप्याचा जाहीर सत्कार प्रजात्ताकदिनाप्रसंगीच्या सत्कारात करण्यात येईल. या जोडप्याशी लिंगांतरासंबंधी कोणी गैरव्यवहार केल्यास सरकारी पारितोषिकाचा अपमान केल्याचा गुन्हा घडेल." असे वृत्त होते.

आम्ही नोंदणी दप्तरात जाऊन लग्नाचे नविनीकरण केले. अविनाशने सरोजचे मंगळसूत्र माझ्या गळ्यात बांधले. मंगळसूत्र गळ्याला विळखा घालीत होते तेव्हा सर्वांगात अगम्य सौख्य भीतीची हृदयंगम वादळे उठली. नोंदणी झाल्याबरोबर पतिराजांनी सुचविले.

"आता घरी न जाता आपण आजची रात्र एखाद्या झकास हॉटेलातच काढू." माझा होकार येण्याच्या आतच टॅक्सीला त्यांनी हॉटेलचा पत्तादेखील सांगितला. आता आपल्याला आपले मत द्यायचे नसून आज्ञा पाळायच्या आहेत, हे मी ओळखलं. पूर्वाश्रमी देखील सरोजची मालकी गाजवण्याची वृत्ती होतीच. आता तर ताम्रपटच मिळाला होता.

जेवताना पतिराजांची वाणी सारखी चालली होती. आपल्या नव्या अवताराचा त्यांनी अतिशय आनंदाने स्वीकार केला होता. मला मात्र आपल्या पूर्वाश्रमीचीच आठवण होत होती.

हॉटेलात जेवताना पतिराजांनी माझी पसंती न विचारता मांसाहारी जेवण व मद्य मागविले. मी त्यावर म्हटले, "मांसाहार व मद्य मला चालणार नाही. ही सवय केव्हा लागली?" "माझ्याबद्दल तुला आणखी पुष्कळ कळायचं आहे. मला कसलीही सवय लागलेली नाही. पण पूर्वीचं सर्व विसर. मला काकूबाईशीच संसार करायला आवडणार नाही."

मी पतिराजांकडे 'आ' वासून पाहू लागले. दुसऱ्याच्या आयुष्याचे नियमन करण्याची मला होस नव्हती; तशी कुणाच्या आज्ञेत राहण्याची देखील नव्हती. सरोजचे नेहमीच अगदी उलट होते. आता हा स्वभाव अधिक उग्र होणार. आपले हे नवजीवन किती दिवस टिकणार?

दुसरे मन म्हणाले, "नवीन अनुभव घ्यायचा तर हाही घेऊन पाहा."

पतिराजांच्या भीतीमुळे मीही मद्याचा घोट घेतला. पतिराज त्या सवतीमुळे माणसात राहतात की नाही, याची काळजी वाटली. जेवणानंतर त्यांनी सिगारेट शिलगावली व स्वत: ओढलेलीच सिगारेट माझ्या तोंडात खुपसली. नाही म्हटले तर पतिराज थोबाडीत देखील मारतील म्हणून एक झुरका जमेल तसा मीही मारला.

आम्ही सुखरुपपणे शय्यागृहात पोचलो. अंग टाकताच त्यांनी खस्सकन मला ओढले. त्यानंतर काय झाले ते "सख्यः शपे यदि तु किंचिदपि स्मरामि" "सख्यानो शपथपूर्वक सांगते. त्यानंतर काय झाले हे मला आठवतच नाही."

मी उशिरा उठले. पतिराज आधीच उठून चहा पीत बसले होते. मी उठल्यावर स्नानगृहात गेले. आरशात पाहिले तो माझ्या उरोजावर नखक्षते दिसली. एवढे होऊन मला कळले नाही? मी त्या क्षतावर यू डी कलॉन चोळले. ते चुरचुरले तेव्हा पतिराजांच्या नखासारखे वाटले. मला योनिस्पंदनाचा अनुभव येऊ लागला.

पुरुष असताना पहिली रात्र मुळीच एवढ्या सुखात गेली नव्हती. पण याचे कारण अनुभव नव्हता. हे होते. माझीच काय पतिराजांची देखील रात्र जेवढी यशस्वी झाली होती तेवढी पूर्वाश्रमी खास झाली नव्हती. तेव्हा या अनुभवावरून भंगाश्वनकथा खरी असे मानण्याचे काहीच कारण नव्हते.

नखक्षतामुळे मला कामशांती मिळाली ही गोष्टही भंगाश्वनकथेची समर्थक नाही. रात्रीच्या उरोजातच कामकेंद्रे असतात, ही कल्पना चुकीची आहे. ज्यांच्या स्तनात कामकेंद्रे आहेत अशा स्त्रियांची संख्या पुरुषांच्या संख्येच्या साधारण बरोबरच आहे, असे सर्वेक्षणामध्ये आढळून आले आहे. पण मी पुरुष असताना जेव्हा पत्नीचा हात आपल्या स्तनाजवळ नेत होतो तेव्हा ती 'हा कसला पुरुष!' म्हणून माझ्याकडे तुच्छतेने पाही. त्यामुळे मला पूर्वी आज मिळालेले सुख कधीच मिळाले नव्हते. अर्थात हाही प्रसंग भंगाश्वनकथेला अनुकूल नाही.

पहिली रात्र आनंदात गेली. पण दर रात्री तेच खस्सकन मला ओढणे, त्यांना भोजनाइतकाच हा व्यवहार नित्याचा असावा, असे वाटत होते. यामुळे दर रात्री आनंद कमी होत गेला. मी चिडून म्हटले,

"हे काय रोज तेच. काही हळुवारपणा नाही, प्रियाराधन नाही. आपली मुद्याशी गाठ. पशुदेखील याच्यापेक्षा जास्त समजूतदार असतात."

"पशुंत विवाह होत नसतात. त्यामुळे त्यांना नित्यच प्रियाराधन करावं लागतं. मानवात प्रियाराधनाचं स्थान विवाहापूर्वीचं आहे. विवाहानंतरचं प्रियाराधन हे नुसतं नाटक आहे. तुला असं नाटक पाहिजे असेल तर पाच-दहा मिनिटं मी अशा नाटकासाठी राखून ठेवतो."

मला या बोलण्याचे आश्चर्य वाटले. सरोज एवढं तर्कशुद्ध कधीच बोलत नव्हती. पुरुषत्व आल्यामुळे प्रगल्भताही आली, असं समजायचं काय?

"हे सर्व खरं असलं तरी मला रोज यांत्रिकपणे हा व्यवहार करता येणार नाही." मी.

"करावा लागेल. हे पत्नीचं कर्तव्य आहे."

"पूर्वाश्रमी तर या तत्त्वाप्रमाणे तुमचं आचरण कधीच झालं नाही."

पतिराजांचा सूर चढला.

"सतत पूर्वजन्मीच्या आठवणीत राहिल्याने आपला हा नवीन जन्म कधीच सुखाचा होणार नाही. म्हणजे तुम्ही नेहमी हुकूम सोडणार. माझ्या भावभावनांना काही महत्त्व नाही?"

"हुकूमच समज."

"हुकूम पाळला नाही तर?"

"तर आपलं पटणं कठीण आहे. तुला पुन: लिंगांतर करावंसं वाटेल. मी आता परत स्त्री व्हायला तयार नाही."

मी दुसऱ्या खोलीत निघून गेले. आतून कडी लावून घेतली. त्यांनी दार ठोठावले नाही. मी विचार करू लागले.

पतीला आज्ञा करण्याचा अधिकार आहे, अशी परंपराच आहे. कर्तव्य म्हणून आपण ही गोष्ट केली तर एवढा काय अनर्थ होणार आहे? नवऱ्याच्या आज्ञा पाळणे व त्याला सुख देणे यात आपल्याला काहीच सुख नाही काय?

मी दार उघडले तेव्हा ते झोपी गेले होते. म्हणजे झोप उडण्याइतकी काही ही भूक प्रबळ नव्हती तर.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी त्यांना माझी शरणागती व मी खोलीत आले होते, हे सांगितले.

मी यापुढील रात्रीपासून 'कर्तव्यपालन' करण्याचा आदेश तंतोतंत पाळला. हे कर्तव्यपालन फारसे कठीण गेले नाही. आपली इच्छा विचारात घेतली जात नाही व इच्छा असली तरी मनधरणी केली जात नाही, याबद्दल स्त्रीचे वैषम्य असते, असे मला या अनुभवावरून वाटले. नवऱ्याला आपला स्वामी मानून त्याला स्वाधीन झाले तर त्यातही एका वेगळ्या तऱ्हेचा आनंद असतो. मानसन्मानाच्या कल्पना फारच प्रबळ असतील तर जीवनातले पुष्कळसे आनंद पारखे होतील.

हे जर एवढे सोपे आहे तर सरोजला ते का जमले नाही? मुळात वासनाच कमी. नवऱ्याबद्दल फारसे आकर्षण नाही, हेच याचे कारण असावे.

पण सत्य यापेक्षा फारच भयंकर आहे, याचा प्रत्यय मला लवकरच आला. माझी पूर्वाश्रमीची पत्नी ज्या शाळेत प्रिन्सिपल म्हणून काम करीत होती तिथेच माझे पतिराज काम करीत होते. त्यांना भेटायला मी एकदा शाळेत गेले. ते खोलीत नव्हते. "थोड्या वेळात येतील. इथेच वाट पाहा" म्हणून चपराशाने सांगितले. वेळ घालविण्यासाठी शेजारच्या पुस्तकांच्या रॅकवरून मी नजर फिरविली. त्यात एक रजिस्टर होते. त्याच्या बांधणीच्या जागेत त्यांच्या अक्षरात 'स्मृतिचित्रे' असे लिहिले होते. मी ते उघडून पाहिले. ती त्यांची निरनिराळ्या व्यक्तींकडून आलेली व त्यांना लिहिलेली पुत्रे वेगवेगळया मथळ्याखाली बांधलेली होती, ती या रजिस्टरमध्ये नुसती ठेवलेली होती. खुद्द रजिस्टरमध्ये खास म्हणता येईल असे काहीच नव्हते. मी ती पत्रे वेगळी काढून शेजारच्या दुकानातून भालिखित करून आणली व मूळ पत्रे जिथली तिथे ठेवून दिली. आता तिथे पतिराजांची वाट पाहण्यात स्वारस्य उरले नाही. मी घरी आले. ती पत्रे वाचण्यास सुरुवात केली.

ही पत्रे पूर्वाश्रमीची होती. एका व्यक्तीला श्रीकांत म्हणून संबोधले होते. दुसऱ्या व्यक्तीला ईश्वर. श्रीकांतच्या पत्रात लिहिलेल्या मजकुराचा मराठी सारांश असा-

कालची डिनर नाइट फार चांगली झाली. तू मला शॅम्पेन प्यायला व सिगारेट ओढायला लावले. एक नवीन अनुभव आला.

मला 'तुला पुष्कळ काही माहीत नाही,' हे पतिराजांचे शब्द आठवले.

"नवऱ्याला फारसे विचारात घेण्याची जरूर नाही. हा एक बावळट माणूस आहे. कॉलेजात असल्यापासून माझ्या मागे लागला होता. शेवटी कटकट मिटविण्यासाठी मी कबूल झाले. मी तुझीच आहे."

दुसऱ्या पत्रात-

"आपल्या साप्ताहिक भेटी स्वर्गीय असतात. तुझ्या सहवासात घालविलेले क्षण जपून ठेवीन."

एका कागदावर खालील कविता लिहिल्या होत्या. त्या पत्राबरोबर पाठवल्या होत्या, असे दिसत नाही. याच ओळी ती घरीही गुणगुणत असे.

"छंद तुझा मजलाऽऽऽ का मुकुंदा लावियला?"

"मुळी लागेना गोड आता मज काही, मज मुळीही करमत नाही." अगदी वाचवत नव्हते. पण या व्यक्ती कोण हे कळण्यासाठी बरेच वाचले. दोघेही माझे मित्रच होते. पण ही प्रकरणे एकाच वेळी घडलेली नव्हती.

मी सुन्न झाले. हे अती झाले. हा संबंध तोडलाच पाहिजे, असा मनाचा निश्चय झाला. पतिराज घरी आल्यावर ती पत्रे त्यांच्या पुढे ठेवली व दरडावून विचारले,

"हे काय?"

"तू शाळेत गेली होतीस तेव्हाच तू चोरी केलीस, हे मला कळले."

''मी चोरी केली आणि तू तुझ्या खांद्यावर विश्वासाने टाकलेली मान कापलीस. विवाहाच्या पवित्र बंधनाला पायदळी तुडविले. मी जर एवढा बावळट होतो तर माझ्याशी लग्न का केलेस? मी मागे लागलो होतो, हे साफ खोटं आहे. मी रीतसर विवाहाची इच्छा दर्शविली होती. तू नाही म्हटल्यावर तो विषय सोडला होता. दुसऱ्या मुलींचा विचार करायला लागलो होतो. विषय पुन: सुरू केला गेला तो तुझ्याकडून.''

''हे पाहा हे सर्व आता बोलून काही उपयोग नाही. या गेल्या जन्मीच्या गोष्टी आहेत. पण तुला काढायच्याच असतील तर घटस्फोट माग.''

यापुढे काय बोलणार? मी दुसऱ्या खोलीत जाऊन रडत बसले. काय करावे याचा निर्णय होईना. दोन्ही प्रकरणे संपून दशक लोटले होते. दोघांच्याही स्वरूपात पुनर्जन्माइतकाच फरक पडला होता.

पण एवढ्या विश्वासघातकी माणसाशी संसार कसा करायचा? आपल्याला जो बावळट समजतो त्याला पतिराज मानून कसे जगायचे? पण ज्या व्यक्तीपासून संतती झालेली आहे, तिला सहज कसे सोडता येईल? मुलावर या प्रकाराचा काय परिणाम होईल? आपण खरेच आपल्या बापाचे आहोत की नाही, याची त्याला शंका वाटू शकते.

एका घरात राहून अबोल्यात एक महिना निघून गेला. असंच राहायचं काय? कसं शक्य आहे? मग शरणागती? अशी शरणागती पत्करली तर सरोजनं जे केलं तेच अविनाश करील. किती वेडी मी? सरोजच्या वर्तनाबद्दल लेखी पुरावा आता सापडला याचा अर्थ सरोज काय करते आहे, हे मला माहीतच नव्हते, असे नाही. सरोजची कृत्य सोसणं कठीण होतं म्हणूनच तर मी सरोजला अविनाश बनवलं, ''पत्नीचा व्यभिचार सहन करणारा पुरुष षंढ समजला जातो. उलट पतीचा व्यभिचार सहन करणारी स्त्री पतिव्रता समजली जाते. तेव्हा षंढ म्हणून गाजण्यापेक्षा पतिव्रता म्हणून गाजावे.''

अविनाशही सरोजसारखाच वागेल, पण तो पुरुष असल्यामुळे पत्नीला कामसुखापासून वंचित ठेवणार नाही, हे व्यभिचारी पतींच्या अनेक उदाहरणावरून दिसतं, म्हणूनच तर आपण ही युक्ती काढली.

पण काहीच न करता नुसती शरणागती पत्करायची नाही. आपल्याला काय करणं शक्य आहे?

असा विचार करीत होते तोच एक पुरुष मला भेटायला आला. हे दौऱ्यावर आहेत हे त्याला माहीत असावे. मी त्याला पाहताच ओळखले. ''हा तर श्रीकांत'' तळपायाची आग मस्तकाला गेली.

तो बोलू लागला,

''आपण मला ओळखलं हे आपल्या संतापलेल्या चेहऱ्यावरून स्पष्ट आहे. पण जे काही घडलं त्यात मुख्य दोष सरोजचाच होता. आपण दोघांनीही लिंगांतर केलं हे सगळीकडे गाजलं. असे करणारे हे पहिलेच जोडपे. मी आपले अभिनंदन करतो.

मी रागावून म्हटलं ''वायफळ बोलण्यात वेळ घालवू नका. विश्वासाने खांद्यावर मान टाकणाऱ्या मित्राचा विश्वासघात करणारा नराधम तू. तुला फक्त व्यभिचाराला स्त्री पाहिजे. तुझी पूर्वीची प्रेयसी लिंगांतर करून बसली आहे. पण तुला त्याचं दु:ख नाही. ज्याचा तू विश्वासघात केलास तो नवराच आता स्त्रीरूप झाल्यामुळे आपले शत्रुत्व करणार नाही. उलट त्याच्या बायकोला जसं आपण वश केलं तसंच त्यालाही स्त्रीरूपात वश करू, या खात्रीने तू आला आहेस.''

तो शांतपणे म्हणाला-

''संतापानं आता काही साधणार नाही. माझ्याकडून तुमचा विश्वासघात झाला हे खरं, पण यात माझ्यापेक्षा सरोजचाच दोष अधिक आहे. मी तिला वश करण्याचा यत्किंचितही प्रयत्न केला नाही. तीच मला घरी बोलवत असे. एवढी तरुण, सुशिक्षित व सुरूप स्त्री आपल्या समागमाची इच्छा करीत आहे म्हणून मला मोह झाला. मोहनला नसता का झाला? केवळ बळी पडलो. तिला लग्नाचे वचन दिले. पण तिला मुळी लग्न कराचेच नव्हते. व्यभिचाराची मजा चाखायची होती. माझा आस्वाद घेतल्यावर साळसूदपणाचा आव आणून तिनेच मला फसविले. त्यावेळी देखील तिच्या सहवासात मीच एकटा नव्हतो. अनेक पुरुषाशी व्यभिचार करायचा हा तिचा स्वभाव आहे. नवऱ्याची तिला यत्किंचित भीती नाही. तो बावळट आहे. 'त्याला केव्हाही खिशात घालता येईल' असं ती म्हणे. तुम्ही माझ्यावर न रागावता तिच्यावर रागवा.''

मला त्याच्या बोलण्यात रस वाटू लागला. 'तिच्यावर रागवा' असेच माझे मन मला सांगत होते. पण दुसरे मन मिस्कीलपणे म्हणे, ''तिच्यावर रागव, पण त्यांच्यावर रागावू नकोस.'' या 'त्यांच्यावर' या शब्दाने मला इतक्या गोड गुदगुल्या झाल्या की स्वाभिमान, न्याय व सात्विक संताप हे सर्व वितळून गेले.

आपल्या बोलण्याचा परिणाम होत आहे, असे पाहून तो पुढे बोलू लागला.

''माझे म्हणणे असे की, आता तिच्यावर सूड घेण्याचा प्रसंग आला आहे. तुम्ही लिंगांतर केल्यावर तिच्यापेक्षा शतपट सुंदर दिसता. स्त्रीसौंदर्याबरोबरच कुशाग्र बुद्धिमत्ता हा योग विरळा आहे. तुमच्या सहवासात पूर्वी मला तुमच्या कुशाग्रतेचा अनुभव आलाच आहे. मी तुम्हाला रोज पाहतो. मला तुमचे फारच आकर्षण वाटू लागले आहे. हा तुमचा नवरा म्हणजे तीच विश्वासघातकी बायको आहे. तेव्हा तिच्यावर सूड घ्या. तुम्ही माझ्याशी लग्न करा. ते शक्य वाटत नसेल तर मला आपला पुरुषमित्र समजा.''

सरोज व मी यात मीच अधिक सुंदर आहे, असे माझेही मत

होते. एका पुरुषाने केलेली स्तुती ऐकून - ती मतलबी आहे, असे पूर्ण माहीत असूनदेखील मी खूश झाले नसते तरच नवल. माझा खरा अपराध सरोजने केला आहे. श्रीकांतने नव्हे! हेही पटण्यासारखेच होते.

पण तर्काला पटले तरी सरोजबद्दल वाटणारा द्वेष मनात फार काळ टिकेच ना. तिच्यावर सूड उगवावा. तिला सुधारावे असेच वाटे. तिच्यावाचून जगावे, असे एक क्षणही वाटले नाही. माझा प्रियकर होऊ पाहणाऱ्या तिच्या प्रियकराचे हे भाषण ऐकूनही नाही.

मी म्हटले, "सूड उगवावा असं मलाही वाटतं. पुरुष म्हणून तुमची माझी मैत्री झाली. पण प्रियकर म्हणून तुमच्याकडे निदान सध्या तरी मी पाहूच शकत नाही. थोडा परिचय झाल्यावर हे कदाचित शक्य होईल. नवरा म्हणून तर तुमच्याकडे पाहणे अशक्य आहे. पण सूड उगवण्याची तुमची कल्पना मला पटते. तुम्ही असें करा. अविनाशला उद्या भेटायला या. तुम्हाला माझ्याशी प्रियकर म्हणून संबंध ठेवायचा आहे, असं सरळ सांगा. मी पण आमच्या प्रेमसंबंधाला त्यांनी हरकत घेऊ नये असे म्हणेन. सरळ त्यांच्यासमोर तुमचे चुंबन घेईन. पाहू ते काय करतात."

श्रीने हे मान्य केले.

मी महिन्यानंतर पहिल्यांदा त्यांना भेटले व श्री तुम्हाला माझ्यादेखत भेटू इच्छितो, असे सांगितले. त्यांनी ते कबूल केले.

तो ठरल्याप्रमाणे आला. पण फार घाबरला होता. ते शरीराने त्याच्यापेक्षा बलिष्ठ होते व नाकावर टिच्चून 'आपली बायकोच मला देऊन टाका' म्हणून म्हणायला आलेल्या माणसावर एकदम हल्ला करतील, असे त्याला वाटत होते.

तो बोलायला कचरला, असे पाहून मीच म्हटले-

"माझ्याशी प्रियकर म्हणून संबंध ठेवायला तुम्ही यांना मान्यता द्यावी, अशी विनंती करायला श्रीकांत आले आहेत. पूर्वीचा प्रकार नवऱ्याच्या संमतीशिवाय झाला म्हणून. तो शोकांत ठरला. आता तुम्ही संमती दिली तर तसे होणार नाही. मी फार आकर्षक आहे म्हणून माझे चिंतन करीत हे काळ घालवत आहेत. प्रेयसी म्हणून माझी प्राप्ती झाली नाही तर यांना जगण्यात अर्थ वाटणार नाही. आपल्याला केवळ एक नवराच नव्हे, तर प्रियकरही असावा, असं मला तुमची पत्रे वाचल्यावर वाटू लागलं आहे. तेव्हा तशी परवानगी असावी."

"माझ्याशी चाळे करताना याने तुझी परवानगी मागितली होती काय?" ते मला विचारते झाले.

ते रागाने थरथरून श्रीकडे पाहत होते. श्री भीतीने भेदरला होता.

"तुम्ही तरी माझी परवानगी मागितली होती काय?" मी.

"या चर्चेत शिरण्यात अर्थ नाही. तुला प्रियकर पाहिजे तर घे. माझी परवानगी कशाला पाहिजे?"

"मला तुमच्याशी घटस्फोट घ्यायचा नाही. नवऱ्याच्या परवानगीशिवाय प्रियकर कसा बाळगता येईल? तुम्ही परवानगी देत नसाल तर तुम्हाला या घरात राहता येणार नाही. हे माझं घर आहे. तुम्ही घर सोडल्यावर मग तुमच्या परवानगीशिवाय मी प्रियकराबरोबर चाळे करीन."

"आणि घटस्फोट ?"

"तो तुम्ही मागायचा. मी नव्हे."

"माझा काय निर्णय आहे हे मी एकदोन दिवसांत तुला सांगेन. याला नव्हे."

"ठीक आहे 'श्री गुड नाइट' असे म्हणून मी त्यांच्या समोरच श्रीचे प्रदीर्घ चुंबन घेतले. श्री थरथरत्या अंगाने व भेदरल्या नजरेने त्यांच्याकडे पाहत होता. चुंबन हे त्याला नागिणीच्या डंखासारखे वाटत होते.

मलाही त्यात प्रियकराच्या चुंबनाचा आनंद नव्हता. मला श्रीबद्दल काहीच आकर्षण नव्हते. विश्वासघातकी सहचरावर सूड घेतल्याचा आनंद मी पुरेपूर उपभोगला.

मला मनोमन खात्री होती की, सरोज व अविनाश कितीही वाईट वागले तरी आपला संबंध कधी तुटू नये, असे त्यांनाही माझ्याप्रमाणेच वाटते व वाटत होते.

तीन दिवसांत त्यांचा निर्णय कळणार होता. हे तीन दिवस माझ्या 'प्रियकरसंबंधांची' बतावणी कायम ठेवणे आवश्यक होते. म्हणून मी **Y.W.C.A.** मध्ये निजायला गेले. सकाळी हातात वर्तमानपत्र पडले त्यात जाड टाइपात शीर्षपंक्ती होत्या-

**लिंगांतराचे दुष्परिणाम :**

पत्नीचा खून करून गुप्त होण्याचा सोपा उपाय म्हणून काही पुरुषांनी लिंगांतर केले. पण डॉक्टरांच्या जवळ त्यांच्याबद्दल पूर्ण नोंदी असल्यामुळे ते सापडले. यापुढे लिंगांतर करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना त्यांच्यावर कोणत्याही गुन्ह्याचा संशय नाही म्हणून प्रमाणपत्र आणावे लागेल.

"रोग आहे तेथे औषध आहे." मी मनात पुटपुटले.

तिसऱ्या सकाळी घरी आले. माझ्या टेबलावर त्यांची चिठ्ठी होती.

"कबूल आहे. घटस्फोट नाही याचा अर्थ आपले संबंध कायम राहतील असे समजू काय?"

मी खाली 'होय' असे एका ओळीत उत्तर लिहून त्यांच्या टेबलावर ठेवले. सुट्टी संपली होती. आज या नव्या रूपात पहिल्यांदाच कामावर जायचे होते. सुट्टीत मी स्त्रीची वेशभूषा शिकण्यासाठी एका अभ्यासक्रमात दाखल झाले होते. शिकलेल्या सर्व कसबाचा मी उपयोग केला. आरशात माझीच आकृती पाहून मी पुरुषरूपात एवढा आकर्षक कधीच दिसलो नव्हतो, असे वाटले. सरोजला मोहन बावळट वाटला. पण अविनाशला कामिनी बावळट वाटणार नाही.

कामावर रूजू होऊन शिकवायला वर्गात आले. दाराशी पोलिस बसला होता. टेबलावर एक लिफाफा होता. लिफाफ्यावर

'अभिनंदन' असे लिहिले होते. उघडून वाचले. खालील कविता होती-

ओठकळ्या बारिकशा, वेतासम डौल अंगयष्टीचा ।
ताठ उरोज शुभाकृती; नाक हरी गर्व वैनतेयाचा ॥१
गोधूमवर्ण निर्मळ मुद्रेवर तेज बुद्धिमत्तेचे ।
रूपात मोहिनीच्या, पाहुनि घ्या दिव्य रूप विष्णूचे ॥२

कविता वाचून मी हर्षित झाले. 'अविनाशला असेच वाटो!' अशी मनात प्रार्थना केली. वर्गाला उद्देशून म्हटले,

"ही कविता मला जर आवडली नाही तर मी मानव नाही असं ठरेल. कविता लिहिणाऱ्याने आपलं नाव लिहिले असतं तर बरं झालं असतं. असो. त्याला व तिला नाव गुप्त ठेवायचं असेल तर ते कळलंच पाहिजे, असा माझा आग्रह नाही. मी कवितेबद्दल कवीचे व इतकी उच्च अभिरूची दाखवल्याबद्दल सर्वांचे आभार मानते" अत्यंत हर्षभराने घरी परतले. भोजनाच्यावेळी मी ती कविता व विद्यार्थ्यांचे अभिनंदन त्यांच्यासमोर ठेवले. ते म्हणाले, "माझ्या पदरी साक्षात मोहिनी पडल्यावर मी बाहेर शेण खाणार नाही."

नेहमीप्रमाणेच स्वयंपाकिणीने केलेला स्वयंपाक गरम करून त्यांना वाढला व त्यांचे झाल्यावर स्वत: जेवण उरकले.

आपल्या खोलीत परत येऊन नेहमीच्या कामास हात घातला. दहा वाजत आले तेव्हा मागून बलिष्ठ पुरुषाचे दोन्ही दणकट हात माझ्या दोन्ही बगलातून शिरले. त्यांच्या मुठी माझ्या उरोजावर आवळल्या.

मी संतापले. ते हात झटकण्याचा प्रयत्न केला. पण माझ्या हातांना जणू पक्षाघात झाला होता. ओरडण्याचा प्रयत्न केला, पण वाचाही मूक झाली. त्यांनी पकड तशीच ठेवून मला ओढत शय्येवर नेले.

मला एकदम सकाळीच जाग आली. धुंदीत व नंतर झोपेत रात्र कशी निघून गेली कळलेच नाही. अजून त्यांच्या त्या मुठी तिथे तशाच आवळलेल्या आहेत असे वाटत होते.

हा तर शुद्ध बलात्कार होता. असे असता 'नाही म्हणून तुजला मी आवरू कशी रे' अशी माझी गत झाली. म्हणजे बलात्काराची घृणा वाटण्याऐवजी त्यात आनंद वाटण्याइतकी मी विकृत आहे काय?

वस्तुत: ते पतीचे हात आहेत, अशी खात्री असल्यामुळे मी वासनेने बेहोश झाले. पण तरी बलात्कारच नाही का?

आनंददायी संभोगाला बलात्कार म्हणत नाहीत. पतीशिवाय दुसऱ्या कुणाचीही माझ्याशी असे वागण्याची हिंमत होणार नाही. पतीशिवाय दुसऱ्या कुणाचा स्पर्श सहन होत नाही यावरून पातिव्रत्य सिद्ध होईल. पण सुसंस्कृतपणा सिद्ध होत नाही.

'सुसंस्कृतपणा? शालीनता हा सद्गुण असला तरी शय्यागृहात तो सद्गुण नाही.' असे डॉक्टर म्हणाले होते. अनुरूपता हे सद्वर्तनाचे स्वरूप आहे. पतीच्या बळाचा अनुभव आल्यामुळे उद्दिपीत होणे यात आक्षेपार्ह काही नाही.

पूर्वीचाच क्रम सुरू झाला. पण त्यांचा 'त्रास' रोजच होता असे. त्यात खंड पडू लागला. आठवड्यातून एकदोन संबंधांनीच त्यांचे समाधान होऊ लागले. ते वारंवार म्हणायचे "पत्नी या नात्याने मी विश्वासार्ह ठरलो नाही. पण पती या नात्याने तुझा कधीही विश्वासघात करणार नाही."

"यापेक्षा जास्त आनंदाची गोष्ट कोणती?"

"मीदेखील श्रीला सोडले आहे. मला व्यभिचारिणीच्या जीवनाचे कधीच आकर्षण नव्हते. मी पतिव्रतेचेच जीवन जगू इच्छिते." याप्रमाणे काही महिने सुखात गेल्यावर डॉक्टरांची दूरवाणी ऐकू आली.

"आम्ही शल्यक्रियेचे एक वर्ष पूर्ण केलेल्या व्यक्तींच्या प्रदीर्घ मुलाखती घेत आहोत. आज संध्याकाळी तुमच्याकडे येऊ दोघांनीही तयार असावे."

डॉ. आपल्या सहकाऱ्यांसह आले. त्यांनी सांगितले.

"आम्ही आमच्या सर्व केसेसचे सर्वेक्षण करीत आहोत. मुलाखतीत मिळालेली माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल. अगदी तुमच्या पतीपासून देखील. मुलाखत घेणाऱ्यांना जेवढी माहिती केवळ आठवणीत राहील तेवढीच या गुपितातून सुटेल. पण त्यांना देखील यासंबंधीचे लेख पाहणे सोपे जाणार नाही. या लेखांना गोपनीय संख्यात्मक नावे देण्यात येतील. कुणीचेही खरे नाव काय, हे कळण्यास त्याला पाच व्यक्तींचे सहकार्य लागेल. "असे सहकार्य आम्ही देणार नाही," असे प्रतिज्ञालेख या पाच व्यक्तींनी दिलेले आहेत.

सर्वेक्षकांना मी माझ्याबद्दल खालील माहिती दिली.

"अगदी प्रथम सांगायचे म्हणजे मला पुन: पुरुष व्हायचं नाही. पूर्वीच्या जीवनापेक्षा हे जीवन जास्त सुखी आहे. विशेष म्हणजे मी लवकरच आई होणार आहे. स्त्रीच्या जीवनातला सगळयात मौल्यवान असा हा अनुभव घेतल्याशिवाय मी कशी पूर्वाश्रमात परत जाऊ?" "स्त्री असल्यामुळे कामजीवनात अधिक रस आला आहे काय?" या प्रश्नाचे उत्तर असे की, पतीला सुख देणे हे विवाहित स्त्रीचे कर्तव्य आहे. त्यापासून स्वत:ला सुख झालेच पाहिजे, अशी अपेक्षा स्त्रीने ठेवू नये, या तत्वानुसार मी वागले. स्वत:ची इच्छा नसताना पतीला सुख देण्याचा प्रयत्न केला तरी त्या संबंधापासून पत्नीला देखील सुख होतेच. इच्छा नसली तरी प्रयत्न केल्यास ती सहज निर्माण होऊ शकते. भंगाश्वनकथेचा निष्कर्ष चुकीचा आहे. पुरुषाचीच कामवासनाच अधिक प्रबळ असते. त्याला कर्तव्य म्हणून साथ देण्याची स्त्रीची इच्छा असेल तर ती पतीला व स्वत:ला देखील सुखी करू शकते."

□□

३८ हिंदुस्तान कॉलनी,
अमरावती मार्ग, नागपूर.